परीक्षा प्राधान्य
महत्वाचे

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/67
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :-०३/०१/२०१७

प्रति,

केंद्र संचालक (सर्व)
शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा
जानेवारी-२०१७

**विषय :-** जीसीसी परीक्षा जानेवारी-२०१७ बॅच बदलाबाबत.

उपरोक्त विषयान्वये आदेशीत करण्यात येते की, जीसीसी परीक्षा जानेवारी-२०१७ सोमवार दि.०९ जानेवारी ते शुक्रवार दि.१३ जानेवारी २०१७ या कालावधीत आपल्या नियोजित परीक्षा केंद्रावर होणार आहे.

जीसीसी परीक्षेस एकाच वेळी एकाच दिवशी दोन किंवा अधिक विषयांची परीक्षा आली असल्यास म्हणजे एकाच वेळी एकापेक्षा अधिक विषयांसाठी एकच बॅच आली असल्यास सदर परीक्षार्थ्यांना बॅच बदल करून देण्याचे अधिकार आपणास देण्यात येत आहेत. बॅच बदलून देत असताना लघूलेखन (SHORT-HAND) विषयासाठी बॅच बदल देवू नये. कारण लघूलेखनासाठी वेळापत्रकात एका विषयासाठी एकदाच बॅच उपलब्ध आहे.

बॅच बदलाबाबत संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र, अन्य फोटो ओळखपत्र, विद्यार्थ्याचा अर्ज आणि संस्थेचे शिफारस पत्र परीक्षेपूर्वी आपल्याकडे परीक्षार्थ्याने सादर केल्यास बॅच बदल देण्यात यावा. बॅच बदलाबाबतचा अहवाल संबंधित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांसह जिल्हा परिरक्षक यांचेकडे स्वतंत्र पाकीटात सादर करावा. जिल्हा परिरक्षकांनी सदरचा अहवाल दि.१७ जानेवारी ते २० जानेवारी २०१७ या कालावधीत होणाऱ्या जिल्हा मूल्यमापन अधिकारी यांच्या बैठकीच्यावेळी परिषदेत समक्ष सादर करावा.

अन्य कोणत्याही कारणासाठी बॅच बदल देण्यात येवू नये. याची नोंद घ्यावी. याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी बॅच बदल दिल्यास संबंधित केंद्रसंचालकांना जबाबदार धरले जाईल. तसेच अशा विद्यार्थ्यांचा निकाल घोषीत केला जाणार नाही.

(सुखदेव डेरे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे

प्रत:-

१. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद सर्व
२. शिक्षणनिरीक्षक (उ/द/प) मुंबई यांना देवून कळविण्यात येते की, आपल्या जिल्ह्यातील जीसीसी परीक्षेचे सर्व केंद्रसंचालक व जिल्हा व तालुका परिरक्षक यांच्या निदर्शनास ही बाब आणून दयावी.

C:\Documents and Settings\NET\Desktop\JAN - 2017\LETTER.docx